जाहीर निवीदा

जिल्हा न्यायालय, विजयनगर, सांगली येथील जुने मोडके/नादुरुस्त सागवानी लाकडी कपाटे, लाकडी टेबल, संगणक टेबल, जाळीच्या लाकडी मोडक्या खुर्च्या, लाकडी मोडक्या खुर्च्या, मोडक्या खुर्च्यांच्या फळ्या, हात व लहान लाकडी तुकडे इत्यादी तसेच इतर दुरुस्त न होणारे लाकडी साहित्य तातडीने खाली नमुद केलेल्या अटींना अधीन राहुन नियमानुसार "जशी आहे तशी" या तत्वावर विक्री करणेबाबत...

सूचना –

१. सिलबंद लखोटे दिनांक ०७/१२/२०२६ रोजी अगर तत्पुर्वी या कार्यालयास पोहचतील असे पाठवावे. त्यानंतर प्राप्त झालेल्या निवीदांचा विचार केला जाणार नाही.
२. निवीदांमध्ये खरेदीचा दर हा **प्रति किलो** अथवा **प्रति नग** याचा स्पष्ट उल्लेख करावा.
३. सदरील सर्व प्राप्त निवीदा हया दिनांक ०८/१२/२०२६ रोजी अथवा त्या नंतर उघडणेत येतील.
४. समितीची शिफारास व त्यास मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सांगली यांची अंतिम मंजूरी मिळालेनंतरच उच्चतम निवीदाकारास मंजूरी आदेश अदा करणेत येईल.
५. **विक्रीची रक्कम** उच्चतम निवीदाकारास एक रकमी या कार्यालयास तात्काळ त्याच दिवशी जमा करावी लागेल.
६. जुनी व मोडकी दुरुस्त न होणारी सागवानी लाकडी कपाटे, लाकडी टेबल, संगणक टेबल, जाळीच्या लाकडी मोडक्या खुर्च्या, लाकडी मोडक्या खुर्च्या, मोडक्या खुर्च्यांच्या फळ्या, हात, व लहान लाकडी तुकडे तसेच इतर नादुरुस्त लाकडी साहित्य हे जिल्हा न्यायालयाचे पार्किंगच्या जागेत ठेवणेत आलेले आहेत व ते कार्यालयीन वेळेत संबंधितांना पाहता येतील.
७. कोणत्याही कारणास्तव निवीदा स्वीकारणेचा किंवा नाकारणेचा अधिकार, जिल्हा न्यायालय, प्रशासनाने राखून ठेवलेला आहे.
८. सिलबंद निवीदाचे लखोटयावर "नादुरुस्त लाकडी साहित्य खरेदी साठी निवीदा" असा उल्लेख असावा.
९. सिलबंद निवीदा **प्रमुख जिल्हा व सत्र न्यायालय, विजयनगर, सांगली** या पत्यावर पाठविणेत याव्यात अथवा कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत समक्ष आणून दयाव्यात.

सांगली
दिनांकः २६/११/२०२६

अधिक्षक,
कार्यव्यवस्थापन विभाग,
जिल्हा न्यायालय, सांगली.

प्रत –
१. जिल्हा न्यायालय, सांगली यांचे सूचना फलकावर प्रसिध्द करणेसाठी
२. संगणक विभाग, (जिल्हा न्यायालयाचे संकेतस्थळावर प्रसिध्द करणेसाठी)
३. जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली.
४. पोलिस अधिक्षक कार्यालय, सांगली.